पुण्य नगरी ▪ गुरुवार, ७ मे २०२६ ▪ कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजचे बारावीत यश

**कोल्हापूर :** बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात कॉलेजने तिन्ही शाखांमध्ये यशाची परंपरा राखत गुणवत्तेचा झेंडा फडकवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे अभिनंदन करण्यात आले. विज्ञान शाखेचा निकाल ९९.२७ टक्के लागला असून, प्रथमेश काकडे याने ९४.६७ टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. श्रद्धा सुतार (९२.१७ टक्के) द्वितीय, तर संचिता कुलकर्णी (९२.०० टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य (इंग्रजी माध्यम) शाखेचा निकाल ९२.७४ टक्के लागला. यामध्ये आर्या दीक्षित व अनिष संकपाळ यांनी ९५.६७ टक्के गुणांसह संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. मनुश्री शहा (९५.३३ टक्के) दुसरी, तर स्वालिया चौधरी (९३.३३ टक्के) तिसरी आली. वाणिज्य (मराठी माध्यम) विभागात सना देसाई (८८.६७ टक्के) प्रथम, साक्षी तोरस्कर व रणवीर अनपट (८६.०० टक्के) द्वितीय, तर स्नेहल माने (८४.६७ टक्के) हिने तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ८७.६७ टक्के लागला. यामध्ये आभा कपाले (८७.६७ टक्के) प्रथम, यशोधन अनुसे (८७.३३ टक्के) द्वितीय, तर संस्कृती रानगे (८४.८३ टक्के) हिने तृतीय क्रमांक संपादन केला. विशेष म्हणजे, अकौंटन्सी विषयामध्ये तीन, कॉमर्स मॅथ्समध्ये दोन, सायन्स मॅथ्समध्ये दोन, तर जिऑलॉजी विषयात नऊ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्रावीण्य मिळवले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची विद्यासमिती आणि कॉलेजने राबवलेल्या विशेष स्कॉलर बॅचच्या प्रयत्नामुळे हे यश मिळाले असून विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो, असे मत प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी स्कॉलर बॅचप्रमुख प्रा. एस. एन. साळुंखे, प्रा. एस. एल. पाटील, प्रा. वर्षा महाडिक, प्रा. भाग्यश्री पाटील, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. सुभाष रानमाळे, विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एम. आर. नवले आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत संवाद
गुरुवार, दि. ७ मे २०२६

नेहमी प्रत्येकाच्या सोबत असणाऱ्या सावलीने बुधवारी दुपारी काही क्षणासाठी साथ सोडल्याचे चित्र पहायला मिळाले. खगोल शास्त्राच्या अभ्यासानुसार याला झिरो शॅडो किंवा शुन्य सावली असे म्हंटले जाते. त्यानुसार सुमारे ५० सेकंदासाठी सावली गायब झाल्याचा अनुभव कोल्हापुरकरांनी घेतला. याची शास्त्रीय अभ्यासानुसार नोंद घेतली असल्याचे विवेकानंद महाविद्यालयाचे पदार्थविज्ञान पदव्युत्तर विभागाचे प्रोफेसर डॉ. मिलिंद कारंजकर यांनी दिली.



## कोल्हापुरकरांनी घेतला झीरो शॅडोचा अनुभव

# सावलीने सोडली साथ!

- ५० सेकंदासाठी सावली झाली गायब
- शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी प्रात्याक्षिके
- आता पुन्हा तीन महिन्यानंतर मिळणार अनुभव





कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज येथे शास्त्रीय अभ्यासाद्वारे विद्यार्थ्यांनी झीरो शॅडोचा अनुभव घेतला. शहरात बुधवारी दुपारी काही क्षणांसाठी सावली गायब झाल्याचे चित्र पहायला मिळाले. (छाया : शशिकांत मोरे)

त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : शहरात बुधवारी दुपारी १२ वाजून २९ मिनिटे ११ सेकंदांपासून ते १२ वाजून ३० मिनिटांपर्यंत सावली अदृश्य झाली होती, अशी नोंद केली असल्याचे डॉ. कारंजकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना याचा अनुभव आणि शास्त्रीय अभ्यास व्हावा, यासाठी वैज्ञानिक उपकरणाद्वारे विवेकानंद महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी नमुद वेळेत महाविद्यालयाच्या आवारात उभे राहुन सावली गायब झाल्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. 'झिरो शॅडो डे' ही घटना पृथ्वीच्या भौगोलिक स्थितीशी आणि सूर्याच्या आकाशातील स्थानाशी संबंधित आहे. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन वृत्तांच्यामध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षांतून दोनदा झीरो सावलीचा आनंद घेता येतो, असे डॉ. कारंजकर यांनी सांगितले.

कुठेही जाताना आपली सावली कधीच साथ सोडत नाही, मात्र बुधवारी काही क्षणासाठी साथ सोडल्याने नागरिकांना याचे कुतूहल वाटले. याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोकळ्या जागेत जाऊन उभे राहत होते.



आपल्या दैनंदिन जीवनात सावली हा एक नैसर्गिक भाग असतो. मात्र वर्षातून काही विशिष्ट दिवस असे येतात, जेव्हा दुपारच्या ठराविक वेळी आपली अथवा कोणताही उभ्या वस्तूची सावली काही कालावधीसाठी पूर्णपणे नाहीशी होते. या अद्भुत घटनेला खगोल शास्त्रामध्ये झिरो शॅडो म्हंटले जाते.

### पुन्हा तीन महिन्यांनी मिळणार अनुभव

वर्षातून तीन महिन्यांनी मकर वृत्तावर, नंतर तीन महिन्यांनी पुन्हा विषुववृत्तावर आणि तीन महिन्यांनी कर्क वृतावरती आपणांस शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो. बरोबर तीन महिन्यांनी सूर्याच्या दक्षिणायन काळात ६ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा एकदा शून्य सावलीचा आनंद घेता येणार आहे.

7/5/26

7/5/26

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ७ मे २०२६

# कोल्हापूरकरांनी घेतला 'झिरो शॅडो'चा अनुभव

## शहरात दुपारी ५० सेकंदांपर्यंत झाली सावली अदृश्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : सूर्य आग ओकत असताना बरोबर १२ वाजता, जे लोक उन्हातान्हात काम, व्यवसायानिमित्त बाहेर पडले होते, त्यांना आपली सावली पुढे दिसत नव्हती. ती पायात आल्याची जाणीव झाली आणि अनोखा खगोलीय अनुभव कोल्हापूरकरांनी घेतला. हाच अनुभव त्यांनी इतर मित्र-मैत्रिणींबरोबर शेअर केला.

आज १२ वाजून २९ मिनिटे ११ सेकंदांपासून ते १२ वाजून ३० मिनिटांपर्यंत म्हणजे, ५० सेकंदांपर्यंत सावली अदृश्य झाली. या वैश्विक घटनेला 'झिरो शॅडो' म्हणून ओळखले जाते. विवेकानंद महाविद्यालयातील पदार्थविज्ञान पदव्युत्तर विभागाचे डॉ. मिलिंद कारंजकर म्हणाले, 'पृथ्वीच्या भौगोलिक स्थितीशी आणि सूर्याच्या आकाशातील स्थानाशी संबंधित आहे. कर्कवृत्त आणि मकरवृत्त यांच्यामध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षातून दोन वेळा हा शून्य सावलीचा आनंद घेता येतो. मात्र, जे लोक कर्क, मकर आणि विषुववृत्त या ठिकाणी राहतात, त्यांना वर्षातून एकदाच शून्य सावली दिवसाचा आनंद घेता येतो.' डॉ. कारंजकर यांनी निरनिराळ्या शास्त्रीय उपकरणांद्वारे सावली कशी नाहीशी झाली, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांना दिले. यावेळी प्रा. डॉ. गणेश नवाथे, विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात डॉ. कारंजकर यांनी शास्त्रीय उपकरणांद्वारे सावली नाहीशी झाल्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थी, प्राध्यापकांना दाखविले.